आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे अंक तिसरा पृष्ठे १२ मार्च २०२३ www.parlekar.com Registered-RNI no. 54781/92

या अंकात
पान ०२ नवनवोन्मेषी उद्योजक
पान ०४ फॅटॅस्टिक मजेस्टिक
पान ०६ 'जीना यहाँ, मरना यहाँ...'
पान ०८ कपाडोकिया




पान ५
परदेशी भाषांच्या वाटेवर चालताना
समीर दामले

# विविध क्षेत्रातील स्त्री शक्तीला सलाम

**आपले पार्ले हे चमचमत्या तार्यांचे बेट आहे असे म्हटले तर चुकीचे ठरु नये. अनेक क्षेत्रांमधे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पार्लेकर चमकत आहेत आणि यात महिला तसूभरही कमी नाहीयेत. त्या सुद्धा विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत.**



लता वा. गुठे ह्या एक प्रथितयश साहित्यिका, संपादिका व प्रकाशिका आहेत. 'विश्व भरारी फाउंडेशन'च्या संस्थापिका 'भरारी क्रिएशन'च्या संचालिका आणि 'भरारी प्रकाशन' च्या प्रकाशिका आहेत. त्यांची एकुण २० पुस्तके प्रकाशित झाली असून 'स्वप्नकळ्या' व 'माझं प्रेम' या ध्वनिमुद्रिकांची निर्मिती (ऑडिओ सीडीज) आणि साम मराठी वाहिनीवरील 'रुणुझुणू' या मालिकेचे गीत लेखन त्यांनी केले आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुंबई जिल्हा अध्यक्ष, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय विलेपार्ले शाखा अध्यक्ष ही पदे त्यांनी भूषवली आहेत. भारतीय पत्रकार कामगार संघ सचिवपदावर आणि युवा साहित्य प्रतिष्ठान संस्थेवर सल्लागार म्हणूनही त्या कार्यरत होत्या. त्यांना ४८ राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.



वैशाली सामंत ह्या गायिका व संगीत दिग्दर्शिका म्हणून दोन दशकांपेक्षा अधिक काळ कार्यरत आहेत.

पॉप क्वीन म्हणून प्रसिद्ध असलेल्या वैशालीच्या संगीताने सर्व भाषिक अडथळ्यांना मागे टाकले आहे हे तिच्या चार्ट बस्टर - 'ऐका दाजीबा' (मराठी-हिंदी) या गाण्यातून दिसून येते. पार्श्वगायिका म्हणून तिने केवळ भारतभरच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर दुबई, बहारीन, कतार, इस्त्रायल, सिंगापूर, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, यूके आणि यूएसमध्ये असंख्य कॉन्सर्ट केल्या आहेत.

२०१० मध्ये झी टीव्ही वरील 'सा रे ग म पा लिटिल चॅम्प्स', २०१२ मध्ये इ टीव्ही वरील 'गौरव महाराष्ट्राचा', २०२२ मध्ये स्टार प्रवाह वरील 'मी होणार सुपर स्टार - छोटे उस्ताद' या कार्यक्रमांत तिने परीक्षक म्हणून सुद्धा काम केले आहे.



प्रज्ञा राजे यांना चित्रकलेचे कुठलेही औपचारिक शिक्षण नसून सुध्दा आज या क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत. वेगवेगळ्या विषयांवरील आणि अनेक माध्यमांमध्ये त्यांची चित्रे आहेत. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमधे सहभाग, तसेच दिल्ली, गोवा, मुंबई, पुणे इथे सोलो आणि ग्रुप शोज केले आहेत.

त्यांची बरीचशी चित्रे ही 'Nurturing & spirituality' ह्या संकल्पनेवर वर आधारित असतात. शेख series, Ananta series, Divinity of woman series, River series, Ganesha series... अशा अनेक series केल्या आहेत. 'वाटीका' ही फुलांची series त्यांनी Lockdown च्या काळात केली होती.



डॉ. मेधा पेठे या २५ वर्षांहून अधिक वर्षे दंतविशारद म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी नायर डेंटल मधून पदवी, न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी यूएसए मधून कॉस्मेटिक डेंटिस्ट्री मध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन, इस्त्रायलमधून इम्प्लांटोलॉजीचा ॲडव्हान्स कोर्स आणि इटलीमधून स्माईल डिझायनिंगचा ॲडव्हान्स कोर्स केला आहे. सर्वोत्कृष्ट इम्प्लांटोलॉजिस्ट म्हणून ४ राष्ट्रीय पुरस्कार व दोन विश्वविक्रमी शस्त्रक्रिया त्यांच्या नावावर आहेत. त्या 'मिसेस इंडिया' मध्ये रोल मॉडेल मुकुट विजेत्या असून गेल्या ६/७ वर्षांपासून श्रावण क्वीनफ या सौंदर्य स्पर्धेच्या जज आणि स्मित तज्ञ हे पद भूषवत आहेत.



## संपादकीय

महिलांना मतदानाचा हक्क मिळावा, सामाजिक रचनेत त्यांना मानाचे स्थान मिळावे ह्यासाठी गेल्या शतकात अमेरिकेत जो लढा दिला गेला त्याची आठवण राहावी म्हणून आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्च रोजी साजरा केला जातो. आज एका शतकानंतर तरी त्या लढ्याची उद्दिष्टे पूर्ण झाली का ? महिलांचे समाजातील स्थान कितपत सुधारले ? पार्ल्यासारख्या सांस्कृतिक दृष्ट्या 'पुढारलेल्या' समाजात तरी महिलांना सामान हक्क व वागणूक मिळते का ?

'मुलगा व मुलगी आमच्यासाठी समान आहेत' असे आपण अभिमानाने सांगतो पण व्यवहारात मात्र जाणता अजाणता फरक केला जातो. मुलगे कितीही उंडारले तरी चालते, त्यांनी थोडीफार व्यसने केली तरी दुर्लक्ष केले जाते पण मुलींनी मात्र सर्व मर्यादा काटेकोरपणे पाळल्याच पाहिजेत अशी अपेक्षा असते. लग्नानंतर तर परिस्थिती फारच बिकट होते. घराचे पावित्र्य राखण्याची, घराण्याच्या परंपरा जतन करण्याची, सर्वांसाठी पडेल ते काम, त्याग करण्याची संपूर्ण जबाबदारी घरातील 'लक्ष्मी' चीच, असे गृहीत धरले जाते. पुरुष मात्र स्वतःच्या मनाप्रमाणे वागायला, जगायला मोकळा. 'आई' ह्या व्यक्तीला तर आपण देवाच्या शेजारीच बसवतो आणि तिचे जीवन घरातील इतरांच्या, विशेषतः मुलांच्या सेवेसाठीच आहे हे आपण तिला चतुरपणे पटवून देतो. ती बिचारी सुद्धा ह्या भावनिक चक्रव्यूहात अडकून आयुष्यभर राब राब राबते.

गेल्या काही वर्षांमधे परिस्थिती थोडी बदलली आहे हे मात्र मान्य करावे लागेल. आज स्त्री उमेदीने घराबाहेर पडली आहे. तिचा आत्मविश्वास वाढला आहे. ती नोकरीत, करिअर मध्ये स्वतःला शोधण्याचा प्रयत्न करत आहे पण ह्यावेळी सुद्धा 'नोकरी करून सुद्धा घरचे सर्व काम चोख करणारी सुपर मॉम' असे जाळे तिच्या भोवताली फेकले जाते व ती त्यात अलगदपणे सापडते. नोकरी आणि घर, दोन्हीकडे लक्ष देण्याच्या नादात स्वतःला हरवून बसते.

'घरची लक्ष्मी', 'आई', 'सुपर मॉम' अश्या वरकरणी देवत्वाच्या जवळ जाणाऱ्या पण प्रत्यक्षात प्रचंड त्याग आणि अपेक्षांचे ओझे वाहणाऱ्या संकल्पनांमध्ये समाज आजवर स्त्रीला अडकवत आला आहे. ह्या सर्व प्रतिमांचे जोखड बाजूला सारून स्त्री जेव्हा एक माणूस म्हणून जगू शकेल, जेव्हा इतर समाजही तिला खोट्या व फसव्या देव्हार्यात न बसवता आपल्या शेजारी मानाचे, हक्काचे स्थान देईल त्या वेळी 'महिला दिन' साजरा करायची गरजच रहाणार नाही. तो दिवस लवकर येवो यासाठी सर्व महिलांना मनापासून शुभेच्छा !

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
अवंती मांडवकर
सलोनी पाटील

editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com

कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# नवनवोन्मेषी उद्योजक

काही माणसांना नेहमीच्या मळलेल्या वाटेवरून चालणे मान्यच होत नाही. त्यांना सतत नाविन्याचा, वेगवेगळ्या प्रयोगांचा आणि सतत काहीतरी शोधायचा ध्यास असतो. असाच एक माणूस म्हणजे श्री. प्रकाश बापट. वडील रिझर्व बँकेत नोकरीला, तर आई शाळेत शिक्षिका. पार्ले टिळक विद्यालय, पार्ला कॉलेज अशा मळलेल्या वाटेवरून जात सरदार पटेल

VIPRA FOOD SPECIALITY
Prakash Vinayak Bapat Enterprise

कॉलेजमधून इंजीनियरिंग केले व अलिबाग जवळील थळ वायशेत इथल्या आरसीएफ प्रकल्पात नोकरीवर रुजू झाले. पण मळलेली वाट इथेच संपली. पाच वर्ष नोकरी केल्यावर



मात्र आता स्वतःचा व्यवसाय करायचा असे ठरवून नोकरीला रामराम ठोकला. पत्नी अश्विनी बँकेत नोकरी करणारी व घराची एक बाजू भक्कमपणे सांभाळायची तयारी असणारी. त्यामुळे उद्यमशीलतेला चांगलेच पाठबळ मिळाले.

इलेक्ट्रिफिकेशन, इलेक्ट्रॉनिक सॉफ्टवेअर बेस्ड ऑटोमेशन हे क्षेत्र खुणावत होते. औद्योगिक व वाणिज्यिक इमारतींमधील 'बिल्डिंग मॅनेजमेंट सिस्टीम' (BMS) चा व्यवसाय सुरू केला. यात फायर अलार्म, फायर प्रोटेक्शन, सी सी टी व्ही - सेफ्टी सिक्यॉरीटी, वीज / पाणी / लिफ्ट, कार पार्किंगचे इलेक्ट्रॉनीक उपकरणांद्वारे व्यवस्थापन व प्रचलन करणे हे कामाचे स्वरुप. हिंदुस्तान लिव्हर, फोर्ड मोटर्स, US Consulate - Delhi, कॅनाडीयन हायकमिशन (मुंबई / दिल्ली), सिप्ला फार्मा गोवा, भारत बायोटेक सारख्या अनेक नामांकित कंपनीचे BMS चे कॉन्ट्रॅक्ट मिळवले. त्या साठी अंधेरी एमआयडीसी, बंगलोर, चेन्नई, दिल्ली येथे स्वतःची ऑफिसेस स्थापित करुन ५० - ६० सहकार्यांच्या साथीने १० -१२ वर्ष बापटांनी हा व्यवसाय कुशलतेने सांभाळला. व्यवसाया निमित्ताने देशांतर्गत व परदेशात सुदूर व अनुभवसंपन्न प्रवास झाला. त्यातूनच खऱ्या अर्थाने ज्ञान संवर्धन होत गेल. तंत्रज्ञानातील नव्या वाटा दृष्टीपथात येत गेल्या. पुढे BMS क्षेत्रात जागतिक पातळीवर काम करणाऱ्या बलाढ्य कंपन्या भारतात अवतरल्या. जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. त्या त्या क्षेत्रात आपण एकमेवाद्वितीय असावे ही त्यांची मनीषा. त्यामुळे बहरलेला व्यवसाय सोडून त्यांनी टनेल मॅनेजमेंट सिस्टीम (बोगद्यांमधील व्यवस्थापन) या क्षेत्रात उडी घ्यायचे ठरवले. त्यावेळी मुंबई पुणे महामार्गाचे काम चालू होते. टनेल मॅनेजमेंट हा प्रकार भारतात माहीतच नव्हता. त्याचा त्यांनी अभ्यास केला व त्या वेळचे मंत्री श्री. नितीन गडकरींना याबद्दल भेटायचे ठरवले. गडकरींनी रात्री साडेदहा अकराला मीटिंग ठेवली. एमएसआरडीसीचे श्री. बॉंगिरवार व त्यांचे सहकारी / सल्लागार मंडळी तसेच IRB चे श्री. म्हैसकर (Sr) असे १५ -१६ अनुभव संपन्न जाणकार हजर होते.. प्रकाशजींनी बोगद्यातील व्यवस्थापनाचे २ तासाचे एक प्रेझेंटेशनच त्याना सादर केले. बोगद्यात एकावेळी किती गाड्या असल्या की किती गॅस जमा होतो. त्यातील हवा खेळती ठेवणे, धुराला वाट करून देणे, आतील दिव्याचे मॅनेजमेंट इत्यादी १५-१६ विविधांगावर पूर्ण माहिती देत विवेचन केले, सखोल चर्चा व प्रश्नोत्तरे झाली. महामार्गावरील व कोकण रेल्वेचे टनेल मॅनेजमेंटचे कॉन्ट्रॅक्ट मिळवले व ते यशस्वीपणे निभावले.

याच कामामुळे त्यांना BRO (बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन) चे जम्मू श्रीनगर रोड वरील जवाहर टनेलचे कामही मिळाले. सैन्य दलाच्या गाड्यांचा मोठा ताफा असतो. त्यावेळी २.१ किलोमीटर लांब व एकच लेन असलेल्या बोगद्यात धुर जमा होऊन २५ जवान गुदमरून दगावले होते. या पार्श्वभूमीवर प्रकाशजींनी अभ्यास करून हे बोगदे स्वयंचलित उपकरणांद्वारे धुरमुक्त करत त्याचे प्रचलन करुन दिले. त्या काळी अतिरेक्यांच्या दहशती कारवायाच्या भितीछायेत ते काम पुर्णत्वास नेले याचा प्रकाशजींना सार्थ अभिमान आहे.

अगदी सुरवातीला मुंबई पुणे परीसरातील टोलनाक्यावर सरधोपट छापील पावती पद्धतीने टोल जमा होत असे. यात भयंकर फसवणूक होत होती. MEP Infra च्या श्री. जयंत म्हैसकर साहेबांना तेथे येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा फोटो निघण्यासाठी कॅमेरे बसवून ऑनलाइन रियल टाईम टोल कलेक्शन व सेल्फ ऑडिट सिस्टीम तयार करून दिली. आलेला फोटो व पावती याचा मेळ घालून ऑडिट करणे सुकर व यशस्वी झाले. अचूक वसुली जमा होऊ लागली. टनेल मॅनेजमेंट व ऑनलाईन रियल टाईम टोल सिस्टीम याचे श्री. प्रकाश बापट पायोनियर ठरले.

हिंदुस्तान लिव्हरच्या टोमॅटो केचप फॅक्टरीत आरोग्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येकाने हातपाय धुवूनच फॅक्टरीत प्रवेश करणे गरजेचे होते. पण यात कामगार वर्गाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसे.



परदेशी यंत्रे भारतात कुचकामी होती. कारण ऑटोमॅटिक ब्रशने बूट साफ करणारी यंत्रे येथे फाटक्या चिखल पाण्यात लडबडलेल्या चुपला

पान ३ वर

पान २ वरून **नवनवोन्मेषी उद्योजक**

वा अनवाणी येणाऱ्या कामगारांचे पाय कसे साफ / निर्जंतुक करणार? श्री. बापट यांनी



फॅक्टरीत पाणी, डिसइन्फेक्शन व ड्रायर अशी हात पाय धुण्याची सिस्टीम तीन महिन्यात तयार करून दिली. अंगावर युनिफॉर्म चढल्यावर या प्रक्रियेतून गेल्यावरच प्रत्येक कामगारांचा / अधिकार्याचा अन्न वा औषध निर्मिती विभागात प्रवेश निश्चित होऊ लागला. हे शक्य झाले Electronics and software based ऑटोमेशनने. त्यामुळे हायजिन लेव्हल उत्तम प्रकारे सुधारली. पुढे ही मशीन्स सिप्ला, मायलेन वोकहार्ड, भारत बायोटेक अशा मोठ्या कंपन्यांनीच नाही तर देशाबाहेरीलही अनेक कंपन्यांनी वापरावयास सुरुवात केली. पर्सनल हायजिन कंप्लायन्स ऑन ऑटो पायलट फयाट ट गलाईनशी इमान राखाणाऱ्या 'Hygiene Station' मशीनचे जनकत्व श्री. प्रकाश बापट यांच्याकडे आहे. ही व्यवसाय प्रणाली आपण फार मोठी करू शकलो नाही हि खंत मात्र श्री. प्रकाशजींना आहे. प्रकाशजींचे दोन्ही मुलगे - चिन्मय व चैतन्य परदेशात Data analytics आणि AI या क्षेत्रात विशेष प्राविण्यसह कार्यरत आहेत. चैतन्यला ब्रिटिश सरकारने 'Global Talent Visa' दिला आहे.

सतत नाविन्याचा ध्यास असणाऱ्या प्रकाशजींचे लक्ष वेधलं ते फ्रोजन फुडने. फ्रोजन फुड म्हणजे कोणत्याही गुणतत्वांचे अवमुल्यन न करता अत्यंत थोड्या अवधीत अतिशित करुन प्रदीर्घ काळ टिकवलेला खाद्यपदार्थ. सध्याच्या धावपळीच्या जगात रस गंध चव उत्तम राखत तयार खाद्यपदार्थांची गरज वाढली आहे.

त्यातच कुशल कामगार वर्गाची कमतरता व दर्जाची पातळी हेही मोठे प्रश्न आहेत. पारंपरिक पदार्थ आवडत असले तरी त्यासाठी खटाटोप प्रचंड असतो. छोट्या व्यावसायिकांसाठी त्यात अडचणी निर्माण होतात. यावर उपाय म्हणजे फ्रोजन फूड. आपल्याकडे पदार्थ बनवून फ्रिझरमध्ये ठेवून कडक केला की फ्रोजन होतो ही मानसिकता. पण त्यात पदार्थाचा दर्जा घसरतोच व तो शिळाही होतो. त्यामुळे आरोग्यास अपायकारक ठरतो. यासाठी blast freezing नव्हे तर IQF टेक्नॉलॉजी वापरणे गरजेचे असते हे प्रकाशजींनी जाणले. खऱ्या अर्थाने IQF तंत्रावर चालणारी मशीन्स भारतात अभावानेच निर्माण होतात. परदेशातून मशीन आणायची तर ५०-१०० कोटीची गुंतवणूक लागते. अशा पद्धतीची टेक्नॉलॉजी रत्नागिरीच्या गद्रे मरीन यांनी अत्यंतिक नाशिवंत अशा मत्स्य व्यवसायासाठी यशस्वीपणे वापरली आहे. मात्र प्रकाशजींनी IQF technology based मशीन्स वर पाच-सहा वर्षे काम केले. छोट्या व मध्यम व्यवसायासाठी तंतोतंत रीझल्ट देणारी मशीन केवळ २५ लाखात बनवली. ज्यात कोणताही खाद्य पदार्थ +३० अंश तापमानातून -३० अंश तापमानाला अवघ्या ३० ते ४० मिनिटात उतरतो. ज्यामुळे त्याची vitamins, minerals, micro nutrients ची मौलिक गुणवत्ता तसेच रंग, रुप, वास, चव, स्पर्श ही पंचेंद्रीयांकडून येणारी मान्यता जशीच्या तशी टिकून राहते. आज निव्वळ पारंपारिक घडणीचे पदार्थ बनवून IQF फ्रोजन स्वरूपात विकण्याचा व्यवसाय प्रकाशजी करत आहेत. यात उकडीचे मोदक, पुरणपोळ्या, थालीपीठ, अळूवडी, कोथिंबीर वडी आणि रेड व व्हाईट ग्रेव्ही, चपात्या, पुऱ्या, समोसे, भरली वांगी असे अनंत प्रकार ते उत्तम कारागीरांकडून बनवून IQF फ्रोजन करून घाऊक प्रमाणात विकतात. त्यांचे पदार्थ मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, अलिबाग, दिल्ली, नागपूर, बंगलूर अशा अनेक शहरातील मोठ हॉटेल्स, केटरिंगवाले घाऊक प्रमाणात खरेदी करतात. हा फ्रोजन पदार्थ कशाप्रकारे Ready to Eat करायचा म्हणजे त्याचा रसगंध स्वाद कायम राहतो याचे शिक्षणही ते देतात.

फ्रोजन पदार्थ फॅक्टरीत तयार झाल्या क्षणापासून ते खाणार्याच्या किचन पर्यंत -१८ अंश C तापमानाला टिकवणे अत्यंत गरजेचे असते. त्या साठी विशेष प्रकारच्या रेफ्रीजरेटेड वाहनांची व्यवस्था स्थापन केली आहे. सध्यातरी रिटेल दुकानांमधे हे पदार्थ न विकता घाउक प्रमाणातच निर्माता ते व्यवसायिक किचन संचालक (B to B) अशी विक्रीपद्धत त्यांनी ठेवली आहे. 'paradigm shift in kitchen convenience without any compromise in health, hygiene & nutrition.' हे या मागचे तत्व आहे. Frozen food as a back end हेच अन्न व्यवसायाचे भविष्य आहे. उद्यमशील तरुणांना उज्वल भवितव्यासाठी ही नामी संधी आहे यात शंका नाही.

मेहनती व धाडसी युवक जबाबदारी घेऊन या व्यवसायात पुढे येणार असतील तर त्यांना मदत, मार्गदर्शन अथवा भागीदारी देण्याची प्रकाशजींची तयारी आहे. त्यामुळे नवीन पिढी व्यवसायात उतरू शकेल. पार्लेकर युवक या संधीचं सोनं करतील का?



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०



# फँटॅस्टिक मजेस्टिक

नवीन वर्ष आले की सुन्याच्या कुटूंबाला वेड लागते ते कालनिर्णय दिनदर्शिकेचे आणि त्यां मागोमाग पारल्यातील टिळक मंदिर येथे होणाऱ्या मजेस्टिक गप्पांचे. सुन्याचे बाबा मजेस्टिक गप्पांच्या कार्यक्रमाचा छापील कागद घेऊन येत आणि मग कालानिर्णय दिनादर्शिकेवर कार्यक्रमाच्या तारखांप्रमाणे व्यवस्थित नोंदणी करीत. सुन्यासुद्धा बाबाच्या मांडीवर बसून मोठ्या कौतुकाने तो कार्यक्रम पाहत असे. मजेस्टिक गप्पा हे जणू सुन्याच्या घरचे कार्य झाले होते. पहिल्या दिवशी कुणा मोठ्या साहित्यिकाची प्रकट मुलाखत असे. त्यादिवशी सुन्याची आई अगदी घरात कुठला तरी गोडाचा पदार्थ करे, देवाजवळ ठेवे. संध्याकाळी सुन्याचे बाबा ऑफिस मधून लवकर घरी येत मग सुन्याचे संपूर्ण कुटुंब मजेस्टिक गप्पाच्या कार्यक्रमाला निघत. टिळक मंदिरामध्ये प्रवेश करण्याआधी ते समोरच्या देवळात जाऊन अंबाबाईचे दर्शन घेत. एव्हाना गप्पांच्यासाठी स्टेजसमोर जाजम मांडलेली असत. तिघेही जण पुढची जागा अडवून धरत. मग सुन्याचे बाबा सुन्याला मजेस्टिक पुस्तक दालनात घेऊन जात. एवढे मोठे पुस्तकदालन आणि त्यात मांडलेल्या पुस्तकांची रेलचेल पाहून सुन्या हरखून जाई. तिथल्या मोठ्या छापाच्या गोष्टी तो तिथून उभ्या उभ्या वाचून काढी. तिथूनच बाबांनी



त्याच्यासाठी भा. रा. भागावातांची फास्टर फेणे, भुताळी जहाज, रॉबिन हूड अश्या अनेक पुस्तकांची खरेदी केलेली असत. मोठ्या मोठ्या लेखकांची पुस्तक पाहून सुन्या हरखून जाई. त्याच्यातोंडाचा मोठाला आ मिटता मिटत नसे. तिथेच त्यांनी मुग्धाची रंगीत गोष्ट आणि सानेगुरुजींच्या मुले आणि फुले तसेच श्यामची आई हे पुस्तक वाचले. एव्हाना बाहेरून माईकचा आवाज सुरु होई. आणि मजेस्टिक गप्पा सुरुवात होई. कधी रत्नाकर मतकरी, कधी ह.मो. मराठे, मग मधल्या दिवसात सुलोचना बाई चव्हाण, कधी नूतन पेंढारकर, अनंत दामले, अरुण साधु, द्वारका नाथ संझागिरी, शिरीष कणेकर, नृत्यनिवेदक अनंत भावे, केसरी चे केसरी भाऊ पाटील. मजेस्टिकचे अशोक कोठावळे उत्तमोत्तम पदार्थांची वैचारीक मेजवानीयुक्त पदार्थ काढीत आणि पार्लेकर खावाय्यांना तृप्त करीत. तेव्हा पार्ल्यात थंडी फार असे गार वारे सुटत आणि त्या गारवाऱ्यावर कधी-कधी सुन्या गाढ झोपी जाई. कधी आईच्या कुशीत तर कधी बाबांच्या मांडीवर मग कार्यक्रम संपला की पाहुणे दर्शकांशी अनोपचारीक गप्पा मारत. दोघांना कुठली घाई नसे. सुन्याला बाबा उठवत आणि सुन्या एवढा वेळ जपून ठेवलेले स्वाक्षरी पुस्तिका पाहुण्यापुढे धरे. स्वाक्षरी मागणण्यांऱ्या अनेक हातात एक हात सुन्याचा असे. अश्या अनेकानेक उत्तमोत्तम स्वाक्षऱ्या त्याच्या पुस्तिकेत विराजमान होत. सुन्या बाबांनी सांगितलेले ऐकत असे लोक म्हणे पार डोंबिवली मधून येऊन पारल्या जवळच्या नातेवाईकांकडे येऊन राहत ह्या मजेस्टिक गप्पांच्या दिवसात. सुन्याचे काकासुद्धा गिरागावातल्या हेमराज वाडीतून गप्पांसाठी येत असे.

पुढे कार्यक्रमाचे स्वरूप बदलत गेले जाजाम जाऊन त्या जागी खुर्च्या आल्या नवीन लेखक कलाकार पाहुणे म्हणून कार्यक्रमाला येत. मराठी बरोबर इंग्रजी पुस्तक आली. आता सुन्याचे स्वत:चे सोनेरी त्रिकोणी कुटुंब झाले आहे तो आता आपल्या कुटुंबाला घेऊन गप्पां ना जातो. सुन्याची मुलगी शरू लहानपणीच्या सुन्यासारखी पुस्तक बघून हरखून जाते. पुस्तक विकत घ्यायचा हट्ट करते. सुन्याला बालपणीची आठवण येते. डोळ्याची कड किंचित ओलावते. सुन्याचे बाबा मुख्य दरवाजातून हा कौतुक सोहळा जणू पाहत आहेत असा त्याला भास होतो. हा भाससुद्धा सुन्याला हवाहवासा वाटतो. हा मजेस्टिक गप्पांचा रेशमी धागा अलगद येऊन सुन्याच्या घराच्या तिसऱ्या पिढीत अलगद गुंफलेला असतो आणि टिळक मंदिराची वास्तू, स्थळ देवता आणि मंदिरा समोरची अंबाबाई ह्या कौटुंबिक सोहळ्यात साक्षी राहून तथास्तू म्हणून मंगलमय आशीर्वाद देत असतात.



सी.ए.केदार अनंत साखरदान्डे
९८३३४ ७७२३३



# परदेशी भाषांच्या वाटेवर चालताना

अंधेरीच्या समीर दामले यांना भाषांची आवड होती. बारावीनंतर पत्रकारितेचा अभ्यासक्रम करावा असे त्यांनीच आईवडिलांशी बोलून ठरवलं. त्यानुसार पार्ल्यातील एनएम कॉमर्स कॉलेजला प्रवेश घेतला म्हणजे बारावीनंतर मबॅचलर इन मास मिडियाफला जाता आलं असतं पण सोबतचे मित्र सीएची तयारी करताना पाहून त्यांनाही वाटलं की सीएच करावं. त्याप्रमाणे ते सीएला गेले खरे, पण पुढे मास मिडियात काम करायचंय तर परदेशी भाषा शिकावी असं वाटल्याने अकरावीतच ते जर्मन शिकू लागला होते. त्यांना भाषेचा अभ्यास एवढा आवडला की सीएचे शिवधनुष्य पेलतानाच त्यानी जर्मनच्या सर्व लेव्हल्स ९० हून अधिक गुणांनी पूर्ण केल्या आणि ते जर्मन मफाडफाडफ बोलूही लागले.

पण नुसती भाषा शिकून पुढे काय ? सीए हा पोटापाण्याचा व्यवसाय आणि मजर्मनफ छंद अशा स्वरूपातच ते राहिलं असतं. त्यास प्रतिष्ठीत अमेरिकन कंपनीत नोकरीही मिळाली होती पण आपल्याला जीवनात काहीतरी करायचंय ते हे नाही अशी टोचणी त्यांच्या मनाला लागली होती. पण काय करावं ते स्पष्ट होत नव्हतं.

परंतु २०१४ साली प्राजक्ताशी लग्न झालं आणि त्यांच्या जीवनमार्गच बदलून गेला. प्राजक्ता फ्रेंचमध्ये बीए होत्या. त्यांची स्वत:ची फॉरिन लँग्वेज इन्स्टिट्युट होती. समीरच्या यांच्या मनात आलं की आपणही याच क्षेत्रात काम का करू नये? त्यांनी आईशी या विषयावर चर्चा केली तेव्हा आईला ही कल्पना आवडली. त्या म्हणाल्या की वर्ष-दोन वर्षे करून पाहा, तुझी सीएची पदवी तर कुणी काढून घेत नाहीये ना. त्यामुळे धीर मिळून समीरने यांनी नोकरी सोडली आणि ते परदेशी भाषांच्या क्षेत्रात पाऊल टाकले. जर्मनच्या जोडीला त्यांनी स्पॅनिश भाषाही शिकून घेतली.





आज ते मप्राजक्ताज इन्स्टिट्युट ऑफ फॉरिन लॅंग्वेजेसफ या जर्मन-फ्रेंच-स्पॅनिश शिकवणार्या प्रतिष्ठित संस्थेचा को-ओनर आहे. भाषांतराची आणि दुभाष्याचे कामंही ते घेतात. नामांकित कॉर्पोरेट्सही त्यांचे ग्राहक आहेत. हल्लीच त्यांची संस्था स्पॅनिश परीक्षेचे स्पॅनिश सरकारचे मान्यताप्राप्त परीक्षाकेंद्र बनली आहे.

त्यांच्याकडे प्रत्यक्ष वर्गासोबत कोरोना काळात ऑनलाईन वर्ग सुरू झाले आणि केवळ मुंबईतूनच नाही तर भारतभरातून आणि जगभरातून विद्यार्थी मिळू लागले. आज ते स्पॅनिश लोकांना स्पॅनिशमधून जर्मन शिकवतात आणि फ्रेंचा लोकांना फ्रेंचमधून इंग्रजी- हिंदी शिकवतात.

परदेशी भाषा शिकणे म्हणजे त्या देशाची संस्कृती शिकणे. समीर-प्राजक्ताने हे लक्षात घेऊनच त्या देशांचा प्रवासही केला. ते त्यांच्या शिकवण्यात नक्कीच दिसून येते. खरोखरच, आपल्या आवडीचेच व्यवसायात रूपांतर केल्याने समाधान मिळते त्यास तोडच नसते.


आम्हा दोघांच्या वाटचालीत आई सविता दामले आणि सासूसासरे अल्पना-मिलिंद परांजपे यांची साथ मिळाल्यानेच हे शक्य झाले असं समीर नम्रपणे नोंदवतो.



सविता दामले
९९३०३ ११५४६







# 'जीना यहाँ, मरना यहाँ...'

सदाबहार

ग्रेटेस्ट शोमन राज कपूर यांचा महत्त्वाकांक्षी चित्रपट 'मेरा नाम जोकर'. हा चित्रपट म्हणजे आसू आणि हसू याची कथा आहे, जो आपल्याला आश्वासन देतो की, मी तुमचे अश्रू घेऊन तुमच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलवीन. चित्रपटातलं गीत 'जीना यहां मरना यहां इसके सिवा जाना कहां' हाच संदेश देणारं.

राजकपूर उर्फ सृष्टी नाथ कपूर उर्फ रणबीर राज कपूर भारताचा ग्रेटेस्ट शोमन. जन्म पाकिस्तानातील पेशावर येथे. वयाच्या दहाव्या वर्षी हिंदी चित्रपटात काम करायला




सुरुवात केली. वयाच्या २४ व्या वर्षापासून चित्रपट दिग्दर्शनाला सुरुवात. दिग्दर्शक म्हणून तसंच नायक म्हणून अनेक हिट चित्रपट दिले. भरपूर नाव कमावलं, पैसा कमावला. आयुष्यात अनेक सुंदर सुंदर स्त्रिया आल्या, पण हळूहळू त्या या शोमनला सोडून विवाह करून आपापल्या आयुष्यात स्थिर झाल्या. आजवर कमावलेला पैसा या चित्रपटाच्या निर्मितीसाठी खर्च झाला. जीना यहां... या गाण्याच्या शूटिंगच्या वेळेस हा शोमन अगदी एकाकी जीवन जगत होता.

मेरा नाम जोकरच्या निर्मितीला १९६५ मध्ये सुरुवात झाली तरी या चित्रपटाचे विचार राज कपूर यांच्या मनात आधीपासून घोटाळात होते १९६० साली मुंबईत रशियन सर्कस आली होती. त्यातील खेळ पाहून राजकपूर यांनी मनात आपल्या या आत्मकथनपर चित्रपटाचं नाव 'मेरा नाम जोकर' हे निश्चित केलं. पटकथा लेखक के. अब्बास यांनी मेरा नाम जोकर वर दोन भागात आणि संपूर्ण तीन तासांचा चित्रपट बनविण्याची पटकथा लिहिली होती. परंतु चित्रपटाला आत्मकथनाची डूब देण्याच्या नादात अनेक अनावश्यक प्रसंग घुसडल्याने चित्रपटाची कथा विस्कळीत झाली. जोकरचं जीवन दाखवण्याच्या उद्देशाने बनवलेली फिल्म त्याचं हसरं, खेळकर जीवन दाखवण्यापेक्षा शोकात्मक जीवनाकडे अधिक झुकली. सहा वर्ष रखडलेला साडेचार तासांचा भारत आणि रशियन कलाकारांचा मिळून बनवलेला चित्रपट मन विषण्ण करणारा शोकान्त चित्रपट ठरला. आठ डिसेंबर १९७० रोजी मुंबईत प्रदर्शित झाला. पहिल्याच दिवशी साफ कोसळला. प्रचंड आर्थिक नुकसान झालं. पण नंतर पुढच्या काळात कल्ट क्लासिक, जागतिक उच्च दर्जाचा चित्रपट ठरला. रशियात मात्र अतिशय यशस्वी झाला.

चित्रपटाचं अवीट गोडीचं संगीत शंकर जयकिशन जोडीचं. मेरा नाम जोकर करिता 'थीम सॉंग' लिहिण्यासाठी गीतकार शैलेंद्रच्या मागे लागून लागून राज कपूर थकून गेला होता. शेवटी एकदाचा शैलेंद्रने गीताचा मुखडा त्याच्या हातात ठेवला 'जीना यहां मरना यहां...' तीन अर्थवाही ओळी वाचून राज प्रचंड खुश झाला. पण पुढचं गीत न लिहिताच शैलेंद्र हे जग सोडून गेला. राजने अनेक जणांकडून पुढचा अंतरा लिहून घेतला. त्याला गाण्याची जबरदस्त जाण होती, त्यामुळे कोणाचंच गीत पसंत पडेना. शेवटी शैलेंद्रचा सुपुत्र शैली शैलेंद्र याने वडिलांचं गीत पूर्ण करून राजकपूरला दाखवलं. ते वाचल्यावर राज बेहद्द खूश झाला. त्याने शैली शैलेंद्र ला आनंदाने कडकडून मिठी मारली.

या गीतांचं चित्रण जेमिनी सर्कस मध्ये झालं आहे. त्यासाठी आर्ट डिरेक्टर मधुकर रामचंद्र आचरेकर यांच्यासह साऱ्या युनिट ला भरपूर मेहनत घ्यावी लागली. सारे प्रमुख कलाकार या गाण्यात आहेत. हातात आपलं हृदय घेऊन राजु जोकर गातो आहे. समोर आयुष्यात येऊन गेलेल्या स्त्रिया बसल्या आहेत...ये मेरा गीत.. जीवन संगीत..गाता गाता काचेचं हृदय वर उडवतो. खाली पडून त्याच्या ठिकऱ्या होतात. आपल्याच हृदयाच्या ठिकऱ्या गोळा करत तो



पुढे गातोय.. कल खेल में.. हम हो न हो.. जोकर च्या मुखवट्या मागून रडतोय... हा चित्रपटाचा उत्कर्ष बिंदू.

जगाला सुखी करता करता अनेक मोठी माणसं स्वत: दु:खी झाली. जोकर तरी दुसरं काय करतो? स्वत: दु:खी असला तरी प्रेक्षकांना सतत हसत ठेवतो. गाण्यातील मोजके कलाकार सोडले तर आज कोणी हयात नाही. पण मुकेशच्या दु:खात भिजवलेल्या स्वरातील, शैलेंद्र आणि शैली शैलेंद्रच हे गीत असंच चिरस्मरणीय राहणार आहे.



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

BECOME A DOCTOR IN PUBLIC UNIVERSITIES, POLAND

- Coaching in English language
- Medicine, Dentistry,
- Public health and Nursing
- Intake starts in September 2023.
- Limited seats available

Admissions open for Medical Universities in Poland

We are Overseas Education Consultant

What we do

- Selection of Country Courses & Submission of Applications
- University admissions.
- Bank loan
- Visa Application
- Overseas Student accommodation.
- Test preparation coaching for IELTS. TOFEL. PTE. GRE. And GMAT.
- Forex Transfer.
- Internship programs for Australia and USA

Contact : D B Kale.
: +91 9870499953

Highgate Academy (India)

info@haindia.com
www.haindia.com

Design by

# पार्ल्यातील जागतिक महिला दिन

साथ संगत महिला मंडळ आणि प्रबोधनकार ठाकरे क्रीडासंकुल यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रबोधनकार क्रीडासंकुल येथे जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या वर्षी संकुलात २८ फेब्रुवारी रोजी हा दिवस साजरा करण्यात आला. नविन लेखकांची पुस्तकं जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या वर्षी नवीन लेखक / लेखिका फअसा विषय होता.



कवि कुसुमाग्रजांना वंदन करून साथ संगतच्या नेहमीच्या प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. डॉ. मेधा शेटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि आरती टिळक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पार्ल्यातील साथ संगत अहिल्यादेवी व्यासपीठ, संवादिनी, सखी मंडळ, रमाबाई परांजपे बालमंदिर, कथाक्लब, सोबती, स्नेहवर्धिनी, गंध सुमनांचा, दिलासा या मंडळांचा सहभाग होता. साधना बहुळकर, डॉ. तरू जिंदाल, आशुतोष जावडेकर, प्रणव सखदेव, चित्रा मेहेंदळे, मानसी जोशी, चित्रा वाघ, छाया पिंगे, शीतल कोळवणकर, श्वेता चिटणीस, दीपा मंडलिक, मुकुंद सराफ, बागेश्री पारेख, आरती टिळक, राजश्री, अनिता नागले, रेखा शिदोरे, सुनीला तेजम, सुरेखा प्रधान, क्षमा गोसावी, सरोज लट्टू, संपदा पाटगावकर, अनुजा बर्वे, अनुराधा बेलसरे.... यांचे पुस्तक लेखन क्षेत्रात नवीन प्रवेश झाल्यामुळे नवीन लेखक / लेखिकांची पुस्तकेफ चर्चेला घेतली गेली. या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे पुरुष लेखक तसंच श्रोत्यांचा सहभाग होता तसेच ३ तासाच्या या कार्यक्रमात अनेक पुस्तकांबद्दल बोलले गेले. संपूर्ण कार्यक्रमाच्या फेसबुक प्रसारणाची जबाबदारी श्वेता चिटणीस यांनी पार पाडली.



# पार्ले टिळकचा 'स्टार्ट अप एक्स्पो'

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनतर्फे शनिवार ४ मार्च रोजी 'स्टार्ट अप एक्स्पो २०२३' चे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नावीन्यपूर्ण उत्पादने आणि प्रोटोटाइप ठेवण्यात आले होते.

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या सेंटर ऑफ आंत्रप्रेन्युअरशिप अँड इनोव्हेशनच्या सहकार्याने या उपक्रमाचे प्रदर्शन सकाळी ९.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत विलेपार्ले पूर्वेकडील चित्रकार केतकर मार्गावरील पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट हॉलमध्ये भरले होते.

या प्रदर्शनाला केंद्रीय शिक्षण खात्याच्या इनोव्हेशन सेलचे असिस्टंट इनोव्हेशन डायरेक्टर दिपन साहू, गॅलक्सी सर्फेक्टंट्सचे सहसंस्थापक आणि संचालक जी. रामकृष्णन आणि ट्रान्सेंडर सर्व्हिसेसचे संस्थापक आणि अध्यक्ष समीर जोशी उपस्थित राहिले होते.










# कपाडोकिया

देशोदेशी

टर्की, सीरिया आणि इजिप्त ह्या तीन देशांना ख्रिश्चन धर्माच्या सुरुवातीच्या इतिहासात किती महत्वाचं स्थान आहे ह्याची मला अजिबात कल्पना नव्हती. सीरियाला अर्थात मी कधीच जाऊ शकलो नाही. तिथे सतत चालू असलेल्या मारामारी मध्ये कोण आपला जीव फुकाफुकी धोक्यात घालणार. परंतु टर्की आणि इजिप्त मध्ये प्रवास केल्यावर ख्रिश्चानिटीच्या तेथील प्राचीन पाऊलखुणांनी मला फार बुचकळ्यात टाकलं.

कारण रोमन सम्राट कॉन्स्टंटाईनने ३१३ साली काढलेल्या मिलानच्या फतव्यानुसार - ख्रिश्चन धर्माच्या पालनाचा अधिकार ज्यांची तशी इच्छा असेल त्या रोमन नागरिकांना मिळाला होता. त्यामुळे मला असं वाटत होतं की त्यानंतर पश्चिमेला सर्व युरोपभर त्याचा प्रसार झाला असणार आणि जेंव्हा १४-१५व्या शतकांपासून युरोपमधील राज्यांनी आपली सत्ता पूर्वेला पसरवली तेव्हाच तो आशिया/आफ्रिका खंडात पसरला असणार. टर्की आणि इजिप्त मध्ये प्रवास केल्यावर ही समजूत किती चुकीची आहे त्याची जाणीव झाली.

ख्रिश्चनिटीला खऱ्या अर्थाने राजाश्रय सर्व प्रथम मिळाला टर्की मध्ये रोमन साम्राज्याची पूर्व आणि पश्चिम अशी दोन शकलं झाल्यावर, पूर्व रोमन साम्राज्याचा सम्राट थिओडोशियस ह्याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करून बाकी सर्व पारंपरिक, धार्मिक प्रथांना बंदी घातल्यावर. परंतु सामान्य प्रजेमध्ये त्याही आधी ख्रिश्चानिटीचा प्रसार झाला असावा. तसंच अजून तग धरून असलेल्या पारंपरिक रोमन धर्माचे अनुयायी, ख्रिश्चानिटीच्याही आधी रोमन साम्राज्यात अधिकृत मान्यता मिळालेल्या ज्यू धर्माचे अभिमानी आणि नवीनच प्रतिष्ठा मिळालेल्या ख्रिस्ताचे पाठीराखे ह्यांच्यात आपलेच वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी तीव्र स्पर्धा (प्रसंगी जीवघेणी सुद्धा) अनेक शतकं चालू असावी. कारण टर्की मध्ये फिरताना ठिकठिकाणी विशेषत: कपाडोकियाच्या डोंगराळ भागात ह्या सर्वांच्या खुणा, गोरेमीच्या गुहा किंवा केमाक्लीचे भूमिगत शहर **(पहा पहिला फोटो गोरमी दरीचा)** अश्या स्वरूपात आपल्याला आज



दिसतात. त्यांची आपण ओळख करून घेऊच.

पण त्या आधी पाहूया चौथ्या शतकात प्रस्थापित झालेला एक ख्रिश्चन मठ आणि त्याभोवतालचा एक अद्वितीय निसर्ग चमत्कार.

त्या मठाची दंतकथासुद्धा फार रोचक आहे. चौथ्या शतकात आजच्या सिरियातील (टर्की, सिरिया, इराक, जॉर्डन ही विभागणी युरोपच्या वसाहतवादाच्या काळात युरोपियन सत्तांनी आपल्या सोयीसाठी स्थानिक लोकांच्यावर लादलेली आहे) अलेप्पो भागात सायमन नावाचा एक ख्रिश्चन धर्मगुरू फार प्रसिद्धीला आला. तो अनेक प्रकारचे चमत्कार करतो अशी सगळीकडे त्याची ख्याती पसरल्यामुळे लांबलांबून लोकं त्याच्या दारात आता हा काय चमत्कार आपल्याला दाखवणार अश्या आशेने गर्दी करू लागले. इतकंच नव्हे तर त्याने रात्रंदिवस नुसते चमत्कारच करावे, खाणे पिणे किंवा देवाची प्रार्थना असल्या फालतू गोष्टीत वेळ दवडू नये अशीही अपेक्षा करू लागले. कुठलीही गोष्ट रोजची झाली की त्याचा कंटाळा माणसाला येणारच मग ते चमत्कार असोत की कारकुनी!

हा रोजच्या कटकटीला कंटाळून सायमन बाबा आपल्या काही शिष्यांसह अलेप्पोहून परागंदा झाला आणि जिथे आपल्याला चमत्कार करून दाखवफ म्हणून वेठीला धरलं जाणार नाही अशी जागा शोधत आजच्या टर्कीतील कपाडोकिया भागात पोचला. कपाडोकियाच्या ह्या डोंगराळ प्रदेशातील चित्रविचित्र डोळे दिपवणाऱ्या आणि डोकं चक्रावून टाकणाऱ्या नैसर्गिक खडक-शिल्पांची निर्मिती सुमारे २५ लाख वर्षांपूर्वी माउंट आर्चियेस ह्या ज्वालामुखीच्या उद्रेकातून झाली. ज्वालामुखीतून फेकल्या गेलेल्या लाव्हाचा तलाव थंड होताना मऊ दगड पायाशी आणि कठीण दगड त्यावरती अशी रचना झाली आणि खालील मऊ दगडांची वाऱ्या पावसात धूप होऊन चित्रविचित्र आकारांचे दगडाचे शेंडे आणि खाली उंच सुळके असा हा संपूर्ण प्रदेश बनला आहे. **(पहा दुसरा आणि तिसरा फोटो).**



पान १२ वर


dial4cleanhome.com
One Stop Solution for Cleaning & Hygiene Needs

घराची स्वच्छता आता एका फोनच्या अंतरावर!

- House Cleaning
- Sofa, Chair, Carpet and Mattresses Shampooing
- Marble Polishing
- Curtain Steam Cleaning
- Office & Restaurant Cleaning
- Water Tank Cleaning of Residential & Commercial Complexes
- Periphery Cleaning of Residential & Commercial Complexes
- Badminton, Tennis Court Cleaning

नवलाईचे नऊ दिवस सरतात आणि नवं घर नवं वाटेनासं होतं. कुठे चहाचे डाग, खिडकीतली जळमटं, मळकट फरशा, भिंतींवर साचलेले धुळीचे थर, मुलांनी सोफ्यावर सांडलेले सरबत... आता या गोष्टी कामवाल्या बायकांकडून साफ कशा होणार? आणि अशा प्रकारे स्वच्छतेकडे दुर्लक्ष म्हणजे रोगराईला निमंत्रण! आधीच ऑफिस आणि घर सांभाळण्याची तारेवरची कसरत. कधी आणि कशी करणार ही स्वच्छता? अहो, पण उत्तर आता सोपं आहे...

dial4cleanhome.com

अडगळीतील घाण असो वा सोफ्यावरची धूळ, कोणतीही हानिकारक रसायने न वापरता अत्याधुनिक उपकरणांनी तुमचं घरच नाही तर तुमचं मन देखील प्रसन्न करते.

कारणं दोन - एक तर काम चोख आणि कर्मचारी विश्वासू!

आता काळजी मिटली आहे नवं घर सदा सर्वदा नवं ठेवण्याची जादूची कांडी फक्त एक फोन करून तुमच्या दाराशी उभी असेल.

Contact : +91-9920561736
www.dial4cleanhome.com

dial4cleanhome.com dial4cleanhome.com dial4cleanhome.com

# अन्यथा

अनेक वर्षांपूर्वी जेव्हा ही कविता मी पहिल्यांदा वाचली तेव्हा अगदी भारावून गेलो होतो. नितांत सुंदर, काव्यमय कल्पना, समर्पक चित्रमय शब्द, तरल उपमा, आणि शेवटच्या ओळीतील बिनतोड युक्तीवादाचा उत्कर्ष बिंदू. व्वा ! काय काय म्हणून सांगू ?

पण नंतर जेव्हा अनेक वेळा या कवितेची पारायणं झाली तेव्हा यातील बेबलच्या सनातन’ मनोऱ्याबद्दलचं कुतूहल वाढू लागलं. तसं पहिल्या वाचनातच काय असावा बुवा हा बेबलचा मानोरा ? या प्रश्नांने डोकं वर काढलं होतं पण कवितेच्या एकंदर वैभवात तो थोडा बाजूला पडला होता. पण



आता मी त्याबद्दल अधिक विचार करू लागलो. त्यात एक रंजक गोष्ट दडली आहे. राज्य नाट्य स्पर्धेतील रौप्य पदक विजेत्यांसाठी आयोजित अभिनयाच्या कार्यशाळेत कुणा विद्वान आमंत्रितानं ती सांगितलेली अंधुक आठवत होती. पण तेवढ्याने समाधान होईना. मग भरपूर वाचल्यावर याबद्दलच्या अनेक दंतकथा कळल्या. त्यातील काही बघूया.

बॅबिलोनियनमधील देऊळ मारडूक ’ ( की मार्डक ?) याच्या कळसावरून या दंतकथेचा उगम झाला. बॅबिलोनियन भाषेत त्याचं नाव बॅब लिऊ ’ म्हणजेच देवाचा दरवाजाफ तर हिब्रू भाषेत बाबेलफ किंवा बावेल’ तर हिब्रूत ’बालाल ’ म्हणजे ’गोंधळ उडवणे ’. तर या थोड्याश्या उच्चार साधर्म्यामुळे ही दंत कथा जन्मली असावी. जेनेसिसच्या प्रकरण ११:९ प्रमाणे प्रलयंकारी पाऊस व पूर यातून वाचलेले नोव्हाचे वंशज बॅबिलोन मधील मेसेपोटेमिया येथील ‘शिनार’ फ भागात वसले. ते एकच भाषा बोलत, एकजुटीने रहात. त्यायोगे ते भरभराटीस आले. मग एका कथेनुसार आगामी पूर परिस्थितीतून वाचण्यासाठी तर दुसऱ्या कथेनुसार आपल्या भराभराटीच निशाण अथवा साजरीकरण (Celebration) म्हणून त्यांनी असा एक मानोरा बांधायचे ठरवलं की ज्याचे टोक अगदी ढगात स्वर्गापर्यंत पोहोचेल व मानवाच नाव त्रिखंडात दुमदुमेल. स्वर्गाशी जवळीक साधण्याच्या मानवाच्या या उद्दामपणाचा देवाला राग आला. त्याने अचानक एकाच वेळी अनेक भाषा जन्माला घातल्या. त्यामुळे गोंधळ उडाला. कोणाचे कोणाला समजेना. यामुळे हा टॉवर कधीच पूर्ण झाला नाही. जगातील सर्व निरनिराळ्या भाषा म्हणे अशा जन्मास आल्या.

परंतु मी ऐकलेली दंत कथा थोडी वेगळी आहे. अधिक नाट्यपूर्ण आहे, त्यात पात्रें आहेत, युद्ध आहे, छद्म आहे, तर्क आहे. जगातील सर्व भाषा एका क्षणात जन्माला आल्याचा तर्क दुष्टपणा नाही. माझ्यातल्या गोष्टी वेल्हाळाला ही आवृत्ती जास्त आवडली. तुम्हांला कशी वाटतेय बघा.

मानव इतका प्रबळ झाला की त्यानं देवांना युद्धात हरवलं आणि मग या विजयाची खूण म्हणून स्वर्गाशी स्पर्धा करणारा हा मनोरा बांधायचं ठरलं. गम्मत अशी याचं काम त्याने देवांच्या पराभूत राजावरच सोपवलं. हे म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार. आपल्याकडे असे दानव मातले की आपले इंद्रदेव लगेच ब्रम्हा, विष्णू, महेश यांपैकी कोणाकडे तरी धाव घ्यायचे आणि आपली सुटका करून घ्यायचे. परंतु इथ ग्रीक पुराणात मात्र देवांच्या राजाने ही कामगिरी आनंदाने स्वीकारली. आपल्या सर्वोत्तम कारागीराला ( हा बहुदा आपल्याकडील विश्वकर्मा कसा तसाच असावा ) काही विशेष सूचना देऊन त्याच्यावर सोपाविली. विश्वकरम्याने लगेच जगभरातील उत्तोमोत्तम असे स्थापत्य शास्त्रातील निष्णात कारागीर पाचारण केले. इथे जरा माझं कल्पनेच वारू उधळलं. काळाची मी त्यात भरपूर लिबर्टी घेतली आहे. मग माझ्या कल्पनेत त्यात इजिप्तमधील पिरॅमिड्सचे कारागीर, इटली व फ्रांस मधील पुतळे बनविणारे, ओडिसा वा तामिळनाडू किंवा भारताच्या कानाकोपऱ्यातून दगडांत सुंदर कोरीव काम करणारे इत्यादी



आले.

आता जो उत्तुंग मनोरा होणार तो अद्भुत व एकमेवाद्वितीय असणार. मानवाची मान कायम ताठ ठेवणारा, राजा खुश. बिचाऱ्याला देवांच्या राजाची पुढची चाल कुठं माहित होती ? पण विश्वकर्मा ती ओळखून होता.

मिळालेल्या सूचनेनुसार त्यांने या साऱ्या कुशल कारागीरांचे त्यांच्या कौशल्यानुसार व खासकरून भाषेनुसार गट तयार केले पण त्यांवर गट प्रमुख (Foreman) मात्र अगदी भिन्न भाषी ठेवले. आता तामिळनाडूच्या कारागीरांचे संयोजन करणारा फ्रांन्सचा, इजिप्तच्या कारागीरांचा इटालियन तर इटालियन कारागीरांचा हिब्रू असं झाल्यावर दुसरं काय होणार ? काहीच होऊ शकले नाही. जे झालं ते अर्धवट व धेडगुजरी.

तर अशी ही या कवितेतील गमतीदार गोष्ट. मला ही आवृत्ती बऱ्याच कारणाकरिता आवडली खासकरून अशा करिता की त्यातील देवांच्या राजाने पराभुत अवस्थेतही डोक शांत ठेवून, अपमान गिळून, कोणताही संशय न येऊ देता ज्या पद्धतीने बाजी उलटवली त्याला तोड नाही.

Business management च्या दृष्टीनेही ही गोष्ट एक वास्तुपाठ ठरते. तुम्ही तुमच्या विषयांत कितीही कुशल असा शेवटी इतरांबरोबर योग्य संवाद साधू शकला नाहीत तर सर्व व्यर्थ आहे. कारण शेवटी आपल्या हाताखालच्या, बरोबरच्या व डोक्यांवरच्याही लोकांशी योग्य भाषेत समन्वयच तर साधायचा असतो मग काम कोणतेही असो . भाषेवर प्रभुत्व खूप महत्वाचं पण तीच आजच्या महाविद्यालयीन शिक्षणातून उच्चाटन झालंय. आजच्या विद्यार्थ्यांच्या अनेक भाषांच्या सरमिसळीतून व्यक्त होण्याची धडपड पाहिली की वाईट वाटतं. आम्ही कॉलेजमध्ये असताना वाणिज्य शाखेतही आम्हांला मराठीला गारंबीचा बापूफ ही श्री.ना.पेंडश्यांची ची कादंबरी आणि इंग्रजीला जॉर्ज ऑरवेल ची ‘Animal Farm’ ही कादंबरी तर इब्सेंन ची ‘Pillars of the society’ व ‘Doll’s House' ही दोन नाटकं अभ्यासाला होती. हे आजच्या मुलांना कदाचित खरं वाटणार नाही. हे सर्व साहित्य त्या-त्या भाषेचे आजही मैलाचे दगड मानले जातात. शिक्षणांत व्यवहारी विषयांच अवाजवी महत्व व भाषेच्या समूळ उच्चाटनाचे परिणाम आपल्यांला रोज अनुभवता येतात. दूरदर्शनाच्या जाहिरातीतील भाषेतील अपरिहार्य सरमिसळ, फलकांवरचे अशुद्ध लेखन, चूकीचे उच्चार, वाक्प्रचार वा म्हणींबद्दल संपूर्ण अज्ञान, अनेक साध्या-साध्या शब्दांचा लोप ही सगळी त्याचीच फळे आहेत.

असो. किंबहुना नसो.

पान १० वर







मनोरंजन विश्व

# आय प्रेम यू

मार्च महिन्यात प्रदर्शित होणाऱ्या एका मराठी चित्रपटाचं नाव आहे 'आय प्रेम यू'. नाव वाचूनच मनातील उत्सुकता जागृत होते.'प्रेम' या संकल्पनेचा वेगळा पैलू या चित्रपटातून छायांकन, संजू-संग्राम आणि यशोधन कदम यांनी संगीत दिग्दर्शन केलं आहे. दाक्षिणात्य अभिनेत्री कयादू लोहार या चित्रपटाद्वारे मराठीत पदार्पण करत आहे .




पाहायला मिळणार आहे. एका मुलीविषयी वाटणाऱ्या आपुलकीचं प्रेमात होणारं रुपांतर आणि त्यानंतर घडणाऱ्या घडामोडींचं कलरफुल चित्रण या चित्रपटात आहे. हा चित्रपट १७ मार्चला प्रदर्शित होणार आहे. 'आय प्रेम यू' या चित्रपटाची निर्मिती साईश्री एंटरटेन्मेंटच्या मधुकर गुरसळ , नितीन कहार यांनी केली आहे.

नितीन कहार यांनीच लेखन आणि दिग्दर्शनही केले आहे. अविनाश सातोसकर यांनी

तिच्या जोडीला अभिनेता अभिजित आमकर मुख्य भूमिकेत आहे. अभिजीतला याआधी आपण 'एक सांगायचंय' आणि 'टकाटक' या मराठी चित्रपटातून पाहिले आहे . एकतर्फी प्रेमाला मिळणारी वागणूक, त्यातून होणारे परिणाम या चित्रपटातून पाहायला मिळतील. कलरफुल आणि म्युझिकल अशी ही प्रेमकथा नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ट्रेलर मधूनच लक्ष वेधून घेत आहे.

# सर्किट

चांदनी बार,ट्रॅफिक सिग्नल, फॅशन , पेज थ्री अशा अनेक पुरस्कारप्राप्त उत्तमोत्तम चित्रपटांची निर्मिती आणि दिग्दर्शन केलेले मधुर भांडारकर आता मराठी चित्रपटाच्या प्रस्तुतीमध्ये पदार्पण करत आहेत. आकाश पेंढारकर दिग्दर्शित 'सर्किट' या चित्रपटाची प्रस्तुती मधुर भांडारकर करत आहेत. या चित्रपटात वैभव तत्ववादी आणि ऋता दुर्गुळे ही जोडी असणार आहे .

भांडारकर एंटरटेनमेंट आणि पराग मेहता प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती मधुर



भांडारकर, फिनिक्स प्रॉडक्शनच्या पराग मेहता, अमित डोगरा आणि देवी सातेरी प्रॉडक्शनच्या प्रभाकर परब यांनी केली असून स्वरूप स्टुडिओचे सचिन नारकर, विकास पवार हे सहनिर्माते आहेत .. येत्या ७ एप्रिलला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे . भालजी पेंढारकर यांचा नातू आकाश पेंढारकर हा गेली अनेक वर्षे मराठी मनोरंजन क्षेत्रात कार्यरत आहे. 'सर्किट' या चित्रपटाचे दिग्दर्शन आकाश पेंढारकर यांचे आहे . .

चित्रपटाची पटकथा आणि संवाद संजय जामखंडी यांची आहे. वैभव तत्ववादी याने या चित्रपटातील भूमिकेसाठी बॉडीबिल्डिंग केलं आहे. त्यासाठी त्याला प्रसाद शिर्के यांचं मार्गदर्शन मिळालं आहे. प्रसाद यांनी आजवर बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध अभिनेता ह्रतिक रोशन, टायगर श्रॉफ, उर्वशी रौतेला यांना बॉडीबिल्डिंग ट्रेनर म्हणून फिटनेसचे धडे दिले आहेत. वैभवनं त्याचा लुक इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. वैभवच्या बॉडी बिल्डिंगचं आणि लुकचं कौतुक सर्वत्र होत आहे.

मराठी चित्रपटाच्या प्रस्तुतीबाबत निर्माता, दिग्दर्शक मधुर भांडारकर म्हणाले, की गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपटाने घेतलेली भरारी मी जवळून पाहिली आहे. मी हिंदी चित्रपटात कार्यरत असलो, तरी मराठी चित्रपट आवर्जून पाहतो. त्यामुळेच मराठी चित्रपटाची निर्मिती-प्रस्तुती करण्याची इच्छा होती. ती संधी मला 'सर्किट' या चित्रपटाद्वारे मिळाली आहे.



गणेश आचवल
९८२१२६८३९१

पान ९ वरून **अन्यथा**

तत्त्वज्ञान त्याचे विवेचन करील
पण कविता त्याचा शोध लावते.
कारण
तो आणि आपण यांच्यातील संबंध
नाही मीमांसेचा, तो आहे फक्त काव्याचा.
आणि म्हणूनच
बेबलच्या सनातन मनोऱ्यामध्ये
जेव्हा नेति - अस्तीचे वादंग
मीमांसक माजवीत असतात,
तेव्हा -
केवळ कवीसाठी
तो करतो स्वतःचा सारांश
इंद्रियसुंदर स्वरूपात
सृष्टीतून उतरतो खाली,
रहस्यदुर्गांच्या उग्र साबल्यांतून
पहारे चुकवीत बाहेर निसटणाऱ्या
कलंदर राजपुत्रासारखा,
आणि
कवीच्या संवादी हातात हात घालून
रागदारीतील महत्तम स्वरासारखा
भ्रमण करतो अस्तित्वाच्या सर्व
सरहद्दींपर्यंत.
- अन्यथा
तुकारामाचा अभंग संभवलाच नसता.



प्रसाद आठल्ये
९८२०६ १३४४५

# रंगुनी रागांत साऱ्या

## पुरिया

हा मला अतिशय आवडणारा राग. एखाद्या संध्याकाळी आपण समुद्रात बुडणाऱ्या सूर्याकडे पाहून आजवरचा जमाखर्च स्वतःशीच मांडायचा असेल तर हा राग उत्तम. यात पुरिया, पुरिया धनाश्री आणि पुरिया कल्याण असे अनेक वेगवेगळे प्रकार आहेत. मी मात्र सर्वांचा एकत्रित विचार करतो. थोडासा उदास, एकाकी, ईश्वराशी जवळीक साधू पहाणारा क्षण प्रत्येकाने अनुभवला असेलच. आत्मचिंतन करायला लावणारा हा माझ्या मते बरोबर पुरियाचा मूड. सूर्यास्ताच्या वेळी गायला जाणारा हा राग एक विलक्षण अनुभव देऊन जातो. बहुतेक त्याच्यात असणाऱ्या कोमल रिषभ ने हा मूड येतो.

एक गाणं जे मला खूप आवडते ते म्हणजे शांताबाईंचं, हृदयनाथांनी स्वरबद्ध केलेलं आशाताईंनी गायलेले जिवलगा, राहिले रे दूर घर माझे, पाऊल थकले माथ्यावरचे जड झाले ओझे. गाण्यात सुरुवातीला जी जिवलगा अशी तान आहे तिथेच हे गाणे हृदयाला भिडतं आणि अक्षरशः ओरबाडतं. एकाकी, दमलेली ती, डोक्यावर जड ओझे घेऊन घर अजून दूर आहे म्हणून खिन्न अशी तिची अवस्था एकदम हृदयातून मनाला बोचते. थकलेल्या पावलांना माथ्यावरचे आधीपासून असलेले ओझे अधिक जड झालेले वाटते. कधी जाणवतं कि तो जिवलग म्हणजे ईश्वर आणि ती म्हणजे आपणच की, आपल्याला एकदम पटत हो असे वाटू शकते. आपण उगाचच डोक्यावर आणि डोक्यात घेतलेल्या ओझ्याकडे बघतो. गाण्यात एका ठिकाणी शब्द नाहीत, सरगम आहे, शांताबाईंचे शब्द कमी पडले म्हणून नाही तर शब्दांची जरूर नाही, शब्दांची गरज संपते अशी भावनांची उत्कटता. कुठेही रसभंग होत नाही. हा touch खास हृदयनाथांचा. प्रत्येक वेळी या गाण्याचा वेगळा अर्थ लक्षात येतो. तज्ज्ञ या गाण्यात पुरिया धनाश्री बरोबर थोडा राग श्री गौरी डोकावतो असे म्हणतात. असेल. असो.

एक आणखी सुंदर राग विशेष गाणे म्हणजे सुमन कल्याणपुर यांनी गायलेलं पाडगावकरांचे शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलांपरीफ. बरोबर पुरिया, थोडा आर्त मारवा सुद्धा दिसतो यात. कदाचित विस्मृतीत गेलेल्या ह्या गाण्यांत आलेली जपून ठेवावी अशी बकुळीची फुले हल्ली कोणी जपून ठेवत नाही. पुढच्या पिढीला बकुळीची फुलेच ठिकशी माहित नाहीत त्यामुळे ती जपून का आणि कशी ठेवायची हे कसे कळणार ? हल्ली प्राजक्त आणि केतकी हे शब्दही totally unknown. शब्दच माहित नसतील तर भावार्थ आणि प्रतीके काय कळणार कप्पाळ. असो.

इतर सुंदर गाणी सांज ये गोकुळीफ, दयाघनाफ आणि हरवले ते गवसले काफ असा प्रश्न विचारून आत्मचिंतन करायला लावणारी.

ख्याल गायकीत अतिशय लोकप्रिय राग पण गायला कठीण असावा. त्यामुळेच हिंदी चित्रपटात फारशी गाणी नाहीत. एक गाणे मात्र अपवाद ,ते म्हणजे ए. आर. रेहमानचे रंगीला चित्रपटातील हाय रामा ये क्या हुआफ हे गाणे गायला त्याला हरीहरन आणि स्वर्णलता या दिग्गज कलाकारांना बोलवावे लागले.

भीमसेनजींचा आवडता राग प्रत्येक प्रकारात बंदिशी आहेतच. धनाश्री त पायलिया झनकार मोरी' किंवा पुरियातलं घडिये गिनत जातफ ऐकायला रसिक जीवाचे कान करून येतात. माझ्या सर्वात आवडत्या चीजा विलंबित आज सो बनाफ आणि द्रुत मधील बहुत दिन बितेफ , पुरिया कल्याण मधील चीजा ह्या त्यांच्या सर्वोत्तम तीन मधील म्हणाव्या लागतील. प्रत्येक घराण्याचा गायक हा राग गातो पण माझ्यामते हा राग भीमसेनजींच्या किराणाफ पद्धतीत हा राग अतिशय खुलून येतो.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८





# लोकमान्य सेवा संघ, पारले १००

शताब्दी वर्ष २०२२-२०२३



मिती फाल्गुन कृ. तृतीया ( शके १९४४ )
ते
मिती चैत्र शु. प्रतिपदा ( शके १९४५ )

## ★ शतकपूर्ती सोहळा ★

शुक्रवार दि. १० मार्च २०२३
ते
बुधवार दि. २२ मार्च २०२३

### ★ कार्यक्रम सूची ★

दि. १० मार्च २०२३ सायंकाळी ६.३० वाजता, ' शताब्दी महोत्सव ', वक्ते - डॉ. विनयजी सहस्रबुद्धे, अध्यक्ष,भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद

दि. ११ मार्च २०२३ सायंकाळी ६.३० वाजता, ' शतकस्वर ', सादरकर्ते - श्री. कौशल इनामदार, संकल्पना - श्री. दीपक करंजीकर
प्रमुख पाहुणे- ***माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य***

दि. १२ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, ' संगीतसंध्या ', सादरकर्ती - श्रीमती बेला शेंडे

दि. १३ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, Zee TV- ' लोकमान्य ' मालिकेतील टीमबरोबर मनमोकळ्या गप्पा

दि. १४ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, Topic : Technology Evolution in Indian stock market 1875 to 2023
Spokeperson - Mr. Ashish Chauhan , MD & CEO National Stock Exchange

दि. १५ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, विषय : रेरा ( RERA) - महारेराचा फेरा
ॲडव्होकेट श्री. शिरीष देशपांडे - कार्याध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत यांची मुलाखत
मुलाखतकार - श्रीमती शुभदा चौकर

दि. १६ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, विषय : अष्टपैलू कलाकार श्री. मिलिंद गुणाजी यांची मुलाखत
मुलाखतकार - श्रीमती चित्रा वाघ

दि. १७ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, ' परिणत कवण जन्मला - एक नृत्याविष्कार ', कलाकार - श्रीमती सोनिया परचुरे

दि. १८ मार्च २०२३ संध्याकाळी ७ वाजता, विषय : सामाजिक संस्था - भविष्यातील वाटचाल
वक्त्या- खासदार श्रीमती पूनमजी महाजन

दि. १९ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, विषय : टिळक पर्व, श्री. अरविंद गोखले यांची मुलाखत
मुलाखतकार - श्री. विकास परांजपे

दि. २० मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, विषय : मन करा रे प्रसन्न, सादरकर्ते - श्री. संजय उपाध्ये

दि. २१ मार्च २०२३ सायंकाळी ७ वाजता, विषय : कलात्मक मनाचे कवडसे
मनसे अध्यक्ष श्री. राजसाहेब ठाकरे यांच्याबरोबर दिलखुलास गप्पा, मुलाखतकार - श्री. अंबरीश मिश्र

दि. २२ मार्च २०२३ सायंकाळी ५ ते ८, गुढीपाडवा हिंदू नववर्ष स्वागत स्फूर्तीयात्रा
प्रमुख अतिथी - ***माननीय श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य***

कार्यक्रम स्थळ : स्वा. सावरकर पटांगण, लोकमान्य सेवा संघ पारले, टिळक मंदिर,
राम मंदिर रस्ता, विलेपार्ले ( पूर्व ), मुंबई - ४०००५७

## ★ सर्वांना हार्दिक निमंत्रण ★

श्री. महेश काळे / डॉ. रश्मी फडणवीस
संघ कार्यवाह

पान ८ वरून

## कपाडोकिया

उंच उंच सुळके ज्यावर चढून जाणे सराईत गिर्यारोहकांनाही जमणार नाही, उभे कडे पोखरून झालेल्या गुहा, थक्क करून टाकणारे दगडाचे विविध आकार अश्या ह्या प्रदेशात सायमनने आपला मठ स्थापला. आज चेपझ तरश्रश्रशू नावाच्या ह्या ठिकाणी टर्कीला भेट देणाऱ्या प्रवाशांची जरी गर्दी दिसली तरी, सायमनने मात्र मुद्दाम येथे वाकडी वाट करून कोणीही यायची मुळीच शक्यता नाही, म्हणून इथे आपला पडावं टाकला होता आणि जरी त्याच्या शिष्यांनी एका कपारीतील नैसर्गिक गुहांत मठ स्थापला असला **(पाहा चौथा फोटो)** तरी तो स्वत: मात्र ह्या **पाचव्या फोटो** सारख्या एका उंच सुळक्यावर मचाण बांधून राहिला.










अर्थात ह्यात मजा अशी आहे की चमत्कारांपासूनफ आपली सुटका करून घेण्यासाठी तो अलेप्पोहून पळून जिथे आला, तो कपाडोकियाचा परिसरच एक त्याने स्वत: दाखवून दाखविलेल्या सर्व चमत्कारांपेक्षा मोठा निसर्गाचा चमत्कार आहे. पाहा सहाव्या फोटोतील हे कातळ शिल्प. कदाचित मठातील दूध चोरून पिणाऱ्या मांजराला सायमन बाबाने शाप देऊन त्याची अशी शिळा करून ठेवली असेल !!

ह्या निसर्गाच्या कलाकृतींना यशस्वी आव्हान देईल असा मानवी स्थापत्याचा आविष्कार आपल्याला दिसतो केमाक्ली सारख्या जमिनीखाली बांधलेल्या शहरात त्याला भेट देऊ आपण ह्या पुढच्या भागात.



**सतीश जोशी**
९८२०२२८२७९